विक्री दराते वाढ व सहकारी दूध संघ / संस्था यांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याबाबत....................

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्रमांक एमएलके-२०११/प्र.क्र. १९१ /पदुम-८

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- ३ नोव्हेंबर, २०११.

वाचा : १) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र. १९/पदुम-८, दिनांक ४ फेब्रुवारी, २०११

२) शासन निर्णय क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र. १८३ /पदुम-८, दिनांक ७ जुलै, २०११.

३) शासन निर्णय क्रमांक एमएलके-२०११/प्र.क्र. १९१ /पदुम-८, दिनांक २५ ऑगस्ट, २०११.

४) शासन पुरकपत्र क्रमांक एमएलके-२०११/प्र.क्र. १९१ /पदुम-८,दिनांक १४ सप्टेंबर, २०११.

**<u>शासन निर्णय</u>**

केंद्र शासनाने दूध व्यवसायिकांकरीता दूध व दुग्धजन्य पदार्थ १९९२ मधील तरतूदीनुसार नोंदणी करण्याचे प्रतिबंध होते. केंद्र शासनाने आता अन्न सुरक्षा कायदा संपूर्ण देशात दि.५/८/२०११ पासून लागू केला आहे. या अंतर्गत आता नोंदणी करण्याचे अधिकार अन्न सुरक्षा प्राधिकरणास राहणार आहेत.

राज्यातील दूध उत्पादकांना शासनामार्फत सहकारी दूध संघ / संस्था यांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याबाबत शासन निर्णय समक्रमांक दिनांक २५ ऑगस्ट,२०११ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १ मधील अनुक्रमांक ३ नुसार राज्यातील सहकारी संस्था / संघ / बहुराज्यीय संघ / एमएमपीओ नोंदणीकृत प्रकल्पांना दूध खरेदी कमिशन अदा करण्याची बाब अंतर्भूत आहे. अन्न सुरक्षा कायद्या अंतर्गत दि.५/८/२०११ नंतर नोंदणीकृत झालेले प्रकल्प/ संघ/ संस्था/ बहुराज्यीय संघ यांना सुध्दा प्रतिलिटर रु. २.९० एवढे कमिशन देय राहील. या संबंधीची विगतवारी ही शासन पुरक पत्र दिनांक १४ सप्टेंबर २०११ मध्ये नमूद केल्यानुसार लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अजयसिंग पाटील)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई-४०० ०१८

सहनिबंधक सहकारी संस्था,(दुग्ध).महाराष्ट्र राज्य, आयुक्त दुग्धव्यवसाय यांचे कार्यालय,वरळी,मुंबई

आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. गोरेगांव, मुंबई

महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई-४०० ०१८

प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे/ नागपूर/ मुंबई/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती